# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission



मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९९५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा - २०१७

**अधिसूचना क्रमांक :एनओटी-३६१७/सीआर-२२/२०१७/तीन** **जाहिरात क्रमांक : ६६/२०१७**

जाहिरात क्रमांक २३/२०१७, दिनांक २६ एप्रिल, २०१७ नुसार आयोगामार्फत दिनांक १६ जुलै, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक संयुक्त पूर्व परीक्षा - २०१७ च्या निकालाआधारे पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा - २०१७ च्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची **पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा - २०१७ रविवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१७ रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| **पोलीस उपनिरीक्षक, गट - ब (अराजपत्रित) (एकूण ६५० पदे)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| पदसंख्या | ८५ | ४६ | १ | १६ | २० | ८ | ९६ | १२ | २८४ | ३६६ | ६५० |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | ५५ | ३० | १ | १० | १३ | ६ | ६२ | ७ | १८४ | २३८ | ४२२ |
| (२) महिला | २६ | १४ | -- | ५ | ६ | २ | २९ | ४ | ८६ | ११० | १९६ |
| (३) खेळाडू | ४ | २ | -- | १ | १ | -- | ५ | १ | १४ | १८ | ३२ |

### ३. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:-

**३.१** वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३.२** महिला व खेळाडूंसाठीचे आरक्षण हे शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.३** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ.ज. वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**३.४** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३.५** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**३.६** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य असल्याबाबत व खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी पात्र ठरतो याबाबत, आयोगास अर्ज सादर करण्यापूर्वीच, सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

**३.७** संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासाठी त्यांना पात्र ठरविणारी आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी** सादर करणे आवश्यक आहे.

**३.८** क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याविषयी अर्ज सादर करण्यापूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर केले तरच त्यांना खेळाडू प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल.

**३.९** शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक:उसप्रे-०३९८/सीआर-४५७/भाग-२/पोल-५अ, दिनांक १५ ऑक्टोबर, २००३ नुसार विकलांग उमेदवार सदर पदाकरीता पात्र नाहीत.

**३.१०** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३.११** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास, अशा मागासवर्गीय उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**३.१२** अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक निकषांसदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा अमागास सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षित प्रवर्गासंदर्भातील सत्य माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

### ४. वेतनश्रेणी :-

रूपये ९,३००-३४,८०० + ग्रेड पे- ४,३०० अधिक नियमांनुसार भत्ते.

### ५. पात्रता :-

**५.१** भारतीय नागरिक

**५.२ वयोमर्यादा :-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | विकलांग उमेदवार |
| | अमागास / मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | |
| **१ ऑगस्ट ,२०१७** | १९ | ३१ | ३४ | ३६ | ३९ | ३६ | ३९ | अपात्र |

**५.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५.४ अर्हता :-**

**५.४.१** सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही तत्सम अर्हता.

**५.४.२** पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा - २०१७ च्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा - २०१७ करीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे.

**५.४.३** अंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारण करणा-या उमेदवारांनी सदर अट मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

**५.४.४** उमेदवाराला मराठी लिहिणे, वाचणे, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**५.५ शारीरिक पात्रता :-**

| पुरुष उमेदवारांकरीता | महिला उमेदवारांकरीता |
|---|---|
| (१)उंची-१६५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२)छाती-न फुगविता किमान ७९ से. मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ सें.मी. आवश्यक | उंची-१५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**६. परीक्षेचे टप्पे - तीन**

**६.१** प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येईल:-

(१) मुख्य परीक्षा - २०० गुण
(२) शारीरिक चाचणी - १०० गुण
(३) मुलाखत - ४० गुण

--------------

**एकूण गुण** - ३४०

**६.२ मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**६.२.१** सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक संयुक्त पूर्व परीक्षा - २०१७ च्या निकालाआधारे, पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा-२०१७ च्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची **दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी** पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या http://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज/माहिती सादर करणे तसेच विहित शुल्क भरणे आवश्यक आहे.

**६.२.३** पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जाद्वारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

**६.३ शारीरिक चाचणीबाबत :-**

**६.३.१** मुख्य लेखी परीक्षेच्या निकालाआधारे शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागते हे विचारात घेऊन उमेदवारांनी वेळीच त्यासाठी सराव व पूर्वतयारी करावी. मुख्य लेखी परीक्षेच्या निकालानंतर सर्वसाधारणपणे दोन आठवड्याच्या अंतराने कधीही शारीरिक चाचणी आयोजित केली जाईल. सरावासाठी पुरेसा वेळ मिळाला नसल्याच्या कारणास्तव शारीरिक चाचणीचे दिनांक बदलून मागता येणार नाहीत किंवा त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

**६.३.२** आयोगाकडून शारीरिक चाचणीचा कार्यक्रम निश्चित होताच तो आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीतील संबंधित पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**६.३.३** आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी संबंधित उमेदवाराने शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. शारीरिक चाचणीसाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेमध्ये बदल करण्याबाबतची विनंती मान्य केली जाणार नाही व त्यामुळे उमेदवाराची शारीरिक चाचणीची संधी वाया गेल्यास त्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल.

**६.३.४** वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीचा दिनांक बदलून देण्याची विनंती करणा-या उमेदवारांना वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या आजार/दुखापत, त्याचे स्वरुप, गांभीर्य व सत्यता तपासणीसाठी लगेचच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस सक्षम वैद्यकीय मंडळापुढे पाठविण्यात येईल.तसेच वैद्यकीय मंडळाने फिटनेस (Fitness) प्रमाणपत्र प्रदान केले तरच त्यांना आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल.

**६.३.५** वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ मागणा-या उमेदवारांच्या बाबतीत सत्यता तपासणीनंतर वैद्यकीय मंडळाकडून प्रतिकूल अहवाल प्राप्त झाल्यास संबंधित उमेदवाराला शारीरिक चाचणीची संधी नाकारण्यात येईल. अशा प्रकरणी आयोगाची फसवणूक करण्याचा प्रयत्न समजून संबंधित उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच उमेदवाराची संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यात येऊन आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीपासून उमेदवाराला प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल. त्याव्यतिरिक्त संबंधित उमेदवारांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

६.३.६ अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत तसेच समर्थनीय कारणासह अर्ज केलेल्या उमेदवारांना शारीरिक चाचणीचा दिनांक व वेळ बदलून देण्याच्या विनंतीबाबत आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार, विचार करण्यात येईल. एखाद्या प्रकरणी आयोगाने विनंती अमान्य केली असेल तर संबंधित उमेदवाराला पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार शारीरिक चाचणीसाठी उपस्थित रहावे लागेल. **तदनंतर** उमेदवाराला पुढील संधी दिली जाणार नाही.

**६.४ प्रमाणपत्र पडताळणी :-**

६.४.१ लेखी परीक्षा व शारीरिक चाचणीच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

६.४.२ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

६.४.३ पात्रतेसंदर्भातील अथवा विविध सवलती संदर्भातील विहित नमुन्यातील मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास कागदपत्रे सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच, संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल व मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**६.५ अंतिम निवड :-** लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

**७. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

७.१ नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

७.१.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

७.१.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदरच परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

७.१.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची परीक्षा जर ती व्यक्ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल तर ती परीक्षा

७.२ प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस उपनिरीक्षक या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा शासनास योग्य वाटेल अशा कारणांव्यतिरिक्त सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहित वसूल करण्यात येईल, अशा प्रकारचे बंधपत्र/हमीपत्र संबंधीत उमेदवारांना द्यावे लागेल.

७.३ प्रस्तुत भरतीकरीता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**८. शुल्क (रुपये):** ७.१ :- अमागास - **५२४/-** ७.२ :- मागासवर्गीय - **३२४/-**

**९. अर्ज करण्याची पध्दत :-**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.

९.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

९.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

९.६ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

९.७.१ शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

९.७.२ "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर "माझे ॲप्लीकेशन" सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे.

९.७.३ 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. **'Unpaid'** लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

९.७.४ **" Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील:- **(अ)** ऑनलाईन पेमेंट **(ब)** नागरी सुविधा केंद्र **(क)** चलनाव्दारे

९.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

९.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

९.७.७ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

९.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

९.७.९ **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

९.७.१० **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

९.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा

शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**९.८ केंद्र निवड** :-

**९.९.१** परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरीता "माझे खाते" मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

**९.९.२** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

**९.९.३** वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**९.९.४** केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१०. प्रवेशप्रमाणपत्र** :-

**१०.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**११.परीक्षेस प्रवेश** :-

**११.१** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**११.२** फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.

**११.३** डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी किंवा कोणतीही संपर्क साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**११.४** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१२.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा योजना**" विभागातील '**सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१३.** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१४.** सदर अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३ ऑक्टोबर, २०१७

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.